0 7 JAN 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी १ लाख ११ हजारांची देणगी देणारे अरविंद पाटील यांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केला. यावेळी अविनाश कुंभोजकर, प्रतिभा कुंभोजकर, ज्योती पाटील व इतर.

# महावीर अध्यासनाला एक लाख ११ हजार देणगी

कोल्हापूर, ता. ६ : जयसिंगपूर येथील अरविंद गिरगोंडा पाटील यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी त्यांच्या पत्नी सुलोचना यांच्या स्मरणार्थ एक लाख ११ हजार रुपयांची देणगी दिली. त्यांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केला. या वेळी अविनाश कुंभोजकर, प्रतिभा कुंभोजकर, ज्योती पाटील, विपुल पाटील उपस्थित होते.

अरविंद पाटील यांनी नवभारत शिक्षण मंडळ सांगली, शांतिनीकेतन कनिष्ठ महाविद्यालय येथे सेवा केली. श्री दत्त कनिष्ठ महाविद्यालय, कुरुंदवाड येथे चार वर्षे प्राचार्य म्हणून काम केले. अध्यासनाच्या इमारत बांधकामास दानशूर, संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले.

0 7 JAN 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्रात कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम सुरू करा

* कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

कोल्हापूर : डॉ. शिर्के म्हणाले, दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने विद्यार्थी,गृहिणी, कामगार, सैनिक, शेतकरी, उद्योजक, बंदीजन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिले जातात. सामाजिक बांधिलकी म्हणून रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरु करावेत. जेणेकरून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळतील. विविध घटकांच्या दैनंदिन व्यवहारातील जीवनाशी निगडीत असावेत. प्रत्येक व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास व ज्ञानावर आधारित कौशल्य विकसित झाली पाहिजेत. प्रास्ताविक वैभव पाटील यांनी केले. आभार उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी मानले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, डॉ. कृष्णा पाटील, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठाकडून पदवी, पदव्युत्तरच्या ५०५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे आजअखेर सुमारे ५०५ निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सध्या सुरू आहेत. शनिवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला २ हजार ४१४ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, ६ जानेवारी रोजी एम.एस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, एम.एस्सी. ऑर्गेनिक केमेस्ट्री, सर्टिफिकेट कोर्स इन फ्रेंच लँग्वेज आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. आजअखेर ५०५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2024
तरुण भारत

# हिवाळी सत्रातील ४९६ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. आज विविध अभ्यासक्रमांच्या वर्णनात्मक परीक्षा महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. शदर परीक्षांसाठी २६५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. चार अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले असून आजअखेर ४९६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. गैरप्रकार करणाऱ्यांवर नियंत्रणासाठी भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JAN 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात १६ जानेवारी व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिक्षणशास्त्र सभागृहात सकाळी १० वा. आयोजित या कार्यक्रमात बिगरशासकीय संघटना, तिचे कार्य व स्वरूप, बिगरशासकीय संस्थांना मिळणारे अर्थसाहाय्य, विविध विकासात्मक प्रकल्पांसाठी अर्थसाहाय्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील संस्था, बिगरशासकीय संस्थांना मिळणारे शासकीय अर्थसाहाय्य आणि शासनाची भूमिका यावर तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2024
लोकमत

# दूरशिक्षण केंद्रातर्फे उद्यापासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएच.डी. प्रवेश परीक्षासाठी सोमवारपासून 'पीएच.डी. प्रवेश परीक्षा तयारी कार्यशाळा' ऑनलाइन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. कार्यशाळा दोन भागांत होणार असून, त्यामध्ये पहिल्या भागात परीक्षेविषयी सामान्य माहिती, संशोधन पद्धती यावर समन्वयक डॉ. के. बी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

07 JAN 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युद्धजन्य स्थितीत शांततेचे जनमानस तयार करणे गरजेचे

## श्रीराम पवार : विद्यापीठात माध्यमांच्या भूमिकेवर कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : युद्धजन्य परिस्थितीत शांततेच्या बाजूने न्यायाचा तराजू झुकवणे ही माध्यमांची भूमिका असायला हवी, अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक, राजकीय विश्लेषक श्रीराम पवार यांनी आज येथे व्यक्त केली. दोन देशांतील युद्ध हा स्कोअर बोर्ड नसून, शांततेचे जनमानस तयार करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागातर्फे मराठी पत्रकार दिनानिमित्त आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. 'पॅलेस्टाईन आणि इस्त्राईल संघर्ष : माध्यमांची भूमिका' या विषयावर त्यांनी संवाद साधला. मानव्यशास्त्र सभागृहात ही कार्यशाळा झाली.

पवार म्हणाले, ''भारत-चीन, युक्रेन-रशिया व पॅलेस्टाईन-इस्त्रायलमधील संघर्षाच्या बुडाशी गेल्याखेरीज वर्तमान समजून घेणे अवघड आहे. गूढ राजकीय रचनांच्या जखमा त्यामागे आहेत. पॅलेस्टाईनना ज्यूंचे अस्तित्व अमान्य आहे. जेरूसलेम ही इस्लाम, ज्यू व ख्रिश्चनांसाठी पवित्र भूमी आहे. त्यामुळे तेथे सातत्याने संघर्ष होताना दिसत आहे.''

ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर यांनी वृत्तपत्रांत युद्धविषयक बातम्यांचे वार्तांकन करताना आलेले अनुभव स्पष्ट केले. प्रा. डॉ. एम. पी. पाटील यांनी पॅलेस्टाईन व इस्त्रायल यांच्यातील प्रश्न लवकर सुटणार नाहीत, असे सांगत नवीन समाज निर्माण करण्याचे आव्हान समोर असल्याचे सांगितले. यावेळी प्रा. प्रताप पाटील, जिल्हा माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती साईसिमरन शेख हिचा सत्कार झाला. यावेळी दिग्विजय कुंभार, एस. एच. मनपाडळेकर उपस्थित होते. प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पत्रकार दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. निशा मुडे-पवार, प्रा. डॉ. एम. पी. पाटील, प्रा. डॉ. प्रताप पाटील, दशरथ पारेकर आदी उपस्थित होते.

### कोल्हापूर प्रेस क्लबतर्फे कार्यक्रम

**■ येथील कोल्हापूर प्रेस क्लबतर्फेही प्रेस क्लब सभागृहात पत्रकार दिनानिमित्त कार्यक्रम झाला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, चारुदत्त जोशी यांनी मार्गदर्शन केले. पत्रकारांसमोरील प्रश्न आणि आव्हाने अशा अनुषंगाने यावेळी चर्चा झाली. बाबूराव रानगे, सौरभ मुझुमदार यांचा सत्कार झाला. प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर यांनी आभार मानले. समीर मुजावर यांनी सूत्रसंचालन केले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2024
तरुण भारत

# पीएच. डी. प्रवेश परीक्षा कार्यशाळा उद्यापासून

कोल्हापूर : पीएच.डी.प्रवेश परीक्षेसाठी उद्यापासून (दि. ८) 'पीएच. डी. प्रवेश परीक्षा तयारी कार्यशाळा' ऑनलाईन आयोजित केली आहे. डॉ. अरुण शिंदे ,डॉ. एस. एस. पाटील, डॉ. व्ही. पी. कट्टी, डॉ. जगन कराडे, डॉ. भारतभूषण माळी ,डॉ. एम. एस. बापट, डॉ. ए. एम. गुरव मार्गदर्शन करणार आहेत. https//forms.gle/yqjqC1RkzMdrA4Yn6 नोंदणी करावी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2024
सकाळ

# 'दिलासा संस्थे'मध्ये अभिवादन कार्यक्रम

कोल्हापूर : 'एकीकडे सावित्रीबाई फुलेंच्या कार्याचा वसा चालविण्याची भाषा बोलायची आणि त्याच वेळी कमी पटसंख्या म्हणून शाळा बंद करण्याची भूमिका घ्यायची, असे घडता कामा नये!,' अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन विभागाचे संचालक प्रा. डॉ. रामचंद्र पवार यांनी व्यक्त केली. 'दिलासा सामाजिक विश्वस्त संस्था' व शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन विभागातर्फे झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. 'दिलासा सामाजिक विश्वस्त संस्थे'मध्ये सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला. डॉ. पवार अध्यक्षस्थानी होते. उद्यानविद्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे प्रमुख डॉ. अभिजित जाधव प्रमुख उपस्थित होते. उद्यानविद्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी 'दिलासा'च्या बागेलाही भेट दिली. 'दिलासा'च्या अध्यक्षा प्रा. डॉ. रूपा शहा यांनी ५० शाळांत जाऊन मुलींच्या मनावर शिक्षणाचे व सबल होण्याचे महत्त्व बिंबविणार असल्याचे सांगितले. सचिन कमाळे यांनी आभार मानले. या वेळी कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

0 7 JAN 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ॲथलेटिक्स स्पर्धेत विकास खोडकेला रौप्य

प्रतिनिधी

कोल्हापूर

चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत विकास आनंदा खोडके याने ११० मीटर अडथळा शर्यतीत रौप्य पदक पटकावण्याची शानदार कामगिरी केली. विकास हा शिवाजी विद्यापीठ संघातून स्पर्धेत सहभागी झाला होता. त्याने अडथळा शर्यतीचे ११० मीटर आंतर हे केवळ १४.३२ सेकंदात पूर्ण करत रौप्य पदक प्राप्त केले. या रौप्य पदकी कामगिरीचा सन्मान करत भारतीय विश्वविद्यालयाच्या समितीने विकासची भविष्यात होणाऱ्या खेलो इंडिया गेम्ससाठी निवड केली आहे. विकास हा न्यू कॉलेजमध्ये शिकत असून त्याला विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रा. अमर सासने, आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स कोच सुभाष पवार व दिग्विजय मळगे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

